श्री राम चंद्र मिशन®

जुलै २०१०

खंड ३ अंक ४

India ECHOES
ONE WORLD ONE HUMANITY

केवळ खाजगी वितरणाकरिता

# चौऱ्यांशीतले गुरुदेव




हे काही वैयक्तिक विचार आहेत – गुरुदेव काय आहेत याविषयी कोणीही ठामपणे सांगू शकणार नाही. ८४ च्या वळणावर गुरुदेवांची तब्येत आता पूर्वीसारखी राहिलेली नाही. ते अतिशय काळजीपूर्वक आपल्या शक्तिचे जतन करतात. ते कार्य करत असतांना अधूनमधून विश्रांती तर घेतातच तसेच आपला वेळ व शक्ति कुठल्याही दबावा खाली न येता अग्रक्रमाच्या कामांसाठी वापरतात. दिवसाच्या शेवटी त्यांचे कुठलेही काम शिल्लक नसते व आम्हाला हे बघून नवल वाटते की कश्याप्रकारे ते आमच्या ई–मेलचे त्याच दिवशी उत्तर देतात मग ते प्रशासनिक काम असो की एखाद्या गरजू अभ्यासीची हाक असो.

गुरुदेव वेगवेगळ्या प्रकारच्या उपचारांना व औषधांना आनंदाने सामोरे जातात. कधीकधी असे वाटते की त्यांच्यावर उपचार करणाऱ्यांच्या आनंदासाठी ते हे करतात. दिवसा ते गडद काचांचा चष्मा वापरतात कारण त्यांच्या डोळ्यांना आता जास्त प्रकाश सहन होत नाही. ई मेल्स वाचण्यासाठी व त्यांना उत्तरे देण्यासाठी बंधू सतबीर किंवा त्यांचा नातू भार्गव त्यांना मदत करतात. जरी त्यांची दृष्टी कमी झाली असली तरी त्यांचे अंत:चक्षू पुर्वीच्याच क्षमतेने कार्य करीत आहेत. एखाद्या व्यक्तिची उपस्थिती ते डोळ्याने कमी बघता अंत:चक्षूने अधिक अनुभवत असतांत.

अनेक गोष्टी वर्ज्य असल्यामुळे त्यांचे जेवण आता एकदमच कमी झाले आहे. परंतु ते नेहमीच काही अभ्यासींसोबत एखाद्या सम्राटाप्रमाणे जेवायला बसतात. ते शांतपणे जेवतात (कदाचित उपस्थितांवर काम करीत असतांत) आणि काही वेळेस एकदम उत्फूल्ल संभाषण असते आणि त्यांना कोणी प्रवृत्त करणारे असेल तर अर्थपूर्ण विनोदी चुटकूले व मार्मिक उत्तरे देखील असतात.

गुरुदेव क्वचितच बाहेर फिरायला जातात परंतु ते त्यांच्या खोलीमध्ये 'वॉकर' घेऊन नियमित व्यायाम करतात. ज्यावेळेस त्यांना शारीरिक अशक्तपणा जाणवतो त्यावेळेस डॉ. मोहनसेल्वनना त्यांच्या जादूई यंत्रांसोबत आमंत्रित केले जाते. गुरुदेव बऱ्याच वेळेस 'सहज' वैद्यकिय केंद्रामध्ये दंतचिकित्सकाची भेट घेतात. पण ते कधीही आपल्या आजारपणाचा बाऊ करीत नाहीत व त्यांच्या विनोदी चुटकूल्यांना ते आजाराशी झगडत असतांनाच बहर येतो.

गुरुदेवांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत मिशनची प्रगती अनेक पटीने झाली आहे व त्यामुळे गुरुदेवांचे काम आणि जबाबदारीसुद्धा अनेक पटींनी वाढली आहे. त्यांना भेटायची तीव्र इच्छा असलेल्यांना ते आपल्या गोल्फ कार्टमधून फिरतांना भेटतात व बोलतात. गुरुदेव मणपक्कम, कलकत्ता किंवा तिरुप्पूरला मुक्कामाला असतांना भारतातील विविध केंद्रांच्या अभ्यासींना त्यांना येऊन भेटण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. आपल्या आश्रमांमध्ये मोठ्या संख्येने आलेल्या अभ्यासींना भेटतांना त्यांना खूपच आनंद होतो व त्यांच्यासाठी ते वारंवार सत्संग देखील संचालित करतांत. भारतातील महत्वाचे आश्रम आणि केंद्रांप्रमाणेच गुरुदेवांची निर्मिती असलेल्या 'ओमेगा' शाळा, सतखोल आश्रम, क्रेस्ट तथा रिट्रीट सेंटर्सना देखील तेवढ्याच प्रमाणात लक्ष देण्याची गरज असते. ते शारिरीक त्रास असतांनासुद्धा वेळातवेळ काढून या सगळ्यांना भेट देत असतांत. परंतू आता त्यांना जास्तवेळ विमानात बसणे शक्य नसल्याने त्यांनी बाहेरील देशांच्या भेटी बंद केल्या आहेत. भारतामध्ये प्रवास ते शक्यतो रस्त्याद्वारे करणे पसंत करतात.

गुरुदेवांचे मुलांकडे विशेष लक्ष असते मग ते 'ओमेगा' शाळेचे विद्यार्थी असोत किंवा आपल्या अभ्यासी पालकांबरोबर आलेली मुले असोत. ते त्यांच्याशी बोलण्यासाठी थांबतात, लहान मुलांचे नामकरण करतात, मोठ्यां मुलां बरोबर हास्यविनोद करतांत, त्यांच्या हातातील काठीच्या टोकाने मुलांच्या डोक्यावर स्पर्श करतात. नवीन पिढी आता जणूकाही उदयाला येत आहे. अर्थातच हेचे श्रेय गेल्या २५ वर्षात गुरुदेवांनी आयोजिलेल्या सुमारे २००० सहजमार्ग लग्नांना द्यावे लागेल.

गुरुदेव स्वभावाने खेळकर, विनोदी व चिरतरुण आहेत आणि त्यांची स्मरणशक्ती ही नेहमीप्रमाणेच अतिशय तल्लख आहे. त्यांनी आता दाढी वाढविली आहे पण ती बाबूजीच्या दाढीपेक्षा लहान आहे. सुरुवातीला आमच्यापैकी काहींना हे थोडे विचित्र वाटले होते पण आता असे वाटते की ते दाढीमध्येसुद्धा आधीसारखेच मोहक व आकर्षक दिसतात.

काही काळा पूर्वी गुरुदेव मला म्हणाले होते की त्यांची एक काकू त्यांना नेहमी म्हणायची की तुझ्यामध्ये श्रीकृष्णांचा अंश आहे. तू अगदी ९० वर्षाचा जरी झालास तरी तितकाच मोहक व आकर्षक दिसशील. शेक्सपियरच्याच शब्दात सांगायचे झाले तर “Age cannot wither, nor custom stale, thy infinite variety” (तुझ्याकडे असलेले वैविध्य रितींमुळे जुने होणार नाही व वय देखील त्याला संपवू शकणार नाही  स्वैर भाषांतर)

बंधू ए. पी. दुरै







# गुरुदेवांच्या जीवनातील एक दिवस

पू. गुरुदेवांची नात माधुरी हिने अत्यंत जवळून त्यांच्या दैनंदिन जीवनाचा टिपलेला हा गोषवारा.

एक विशिष्ट दिवस, स. ४.३० वा. रात्रभराच्या विचलीत झोपेनंतरही गुरुदेव भल्यापहाटे जागे झाले. अजिबात वेळ न घालविता ते तयार झाले व सकाळच्या ध्यानासाठी बसले.

स.५.३० वा. ध्यान संपल्यानंतर ते कॉफी पिण्यासाठी व सकाळच्या हवेची झुळूक अनुभवण्यासाठी व्हरांड्यात गेले. यावेळी त्यांच्यासोबत रहाण्याच्या अपेक्षेने अभ्यासीदेखील उठून तयार आहेत व हळूहळू त्यांची यायला सुरुवात झाली आहे. 'ते' आनंदाने अभ्यासींच्या अभिवादनास उत्तर देत आहेत व त्यांना आपल्या बाजूला बसवून घेत आहेत.

स.६.१५ वा आत्ता त्यांनी कॉफी संपवली आहे व त्यांच्या दैनिक कार्याची सुरुवात करण्यासाठी ते आता त्यांच्या कार्यालयाकडे जात आहेत. त्यांनी रोज येणाऱ्या इ–मेल्सने सुरुवात केली व न थकता त्या सगळ्यांची उत्तरे पाठविली.









स.७.०० वा. दोन वेगवेगळ्या केंद्रांमध्ये काम करण्यासाठी दोन प्रशिक्षक तयार करण्याचे कामास त्यांनी सुरुवात केली. ते संपल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की आठ वाजले आहेत व ही नाश्त्याची वेळ आहे.





स. ८.३० वा. गुरुदेवांनी नाश्ता संपवीला व ते त्यांच्या खोलीमध्ये गेले. तेथे ते उपस्थित अभ्यासींना भेटतात. ते त्यांच्यासोबत संभाषण करतात व नवीन लग्न झालेले, वाढदिवस असणारे, लहान मुले व दुरुन आलेल्यांना त्यांच्या कार्यालयात परत जाण्याअगोदर कटाक्षाने भेटतात. उपस्थितांना त्यांनी ९ वाजताची सिटींग कबूल केली.

स. १०.०० वा. सिटींग संपल्यानंतर ते परत कार्यालयात गेले व केंद्रांचे प्रशासन, आश्रम, वित्तपुरवठा, नव्या इमारती आदीसंबंधी कामास सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी काही महत्वाच्या पदाधिकाऱ्यांबरोबर बैठकीत भाग घेतला.





स. ११.३० वा. जेवणापुर्वी सुमारे एक तास त्यांनी त्यांच्या रशियन भाषेचा पाठ संगणकाद्वारे पूर्ण केला.

दु. १२.३० वा. योगायोगाने त्यांच्याबरोबर जेवण घेण्यासाठी ३ रशियन्सना आमंत्रित करण्यात आले आहे. त्यांनी भाषेचा सराव केला व त्यांच्या उपस्थितीचा आनंद घेतला.

दु. १.३० वा गुरुदेव आता एक छोटा वार्तापट बघावयास जात आहेत. साधारणत: प्राणी जीवनावर आधारित वार्तापटाची ते निवड करतात.

दु. २.३० वा. दुपारच्या वामकुक्षीसाठी त्यांच्या आरामकक्षात गेले. झोपण्याअगोदर अर्धातास त्यांनी वाचनात घालवला.

सं.५.०० वा. त्यांनी उठल्यावर साधारणत: अर्धातास त्यांच्या श्वासासंबंधीचे व्यायाम केले व ते आता कॉफीसाठी तयार आहेत. यानंतर ते त्यांच्या गोल्फ कार्टमधून मणपक्क्रम आश्रमात फेरफटका मारावयास गेले व रस्त्यांत वाट पहाणाऱ्यांना भेटले व नवीन ऑडिटोरीयमच्या बांधकामाचा आढावा घेतला. मार्गात येणाऱ्या उपहारगृहात ते थांबले व उपस्थित सर्वांसोबत नाश्ता केला.

सं. ५.३० वा – गुरुदेव अभ्यासींबरोबर बाहेर बगीच्यामध्ये बसले व शहाजहानपूरमधील बाबूजींसोबतच्या त्यांच्या आठवणी सांगितल्या. त्यानंतर त्यांनी सिटींग दिली जी ४५ मिनीटे चालली. त्यानंतर ते संध्याकाळच्या कामासाठी कार्यालयात परत आले.

सं. ७.३० वा आलेल्या सर्व नवीन इमेल्सना उत्तर दिल्यानंतर व डायरी लिहिल्यानंतर ते रात्रीच्या जेवणासाठी गेले.

रा.८.३० वा. रोज चित्रपट बघण्याची वेळ. त्यांनी एका अभ्यासीने आणलेल्या संग्रहामधून एकाची निवड केली व तो इतरांसोबत बघीतला.

रा. १०.३० वा व्यस्त असा दिवस घालवल्यानंतर शांत झोप घेण्यासाठी आरामगृहात गेले.





## गुरुदेवांची तिरुपूर भेट

दि. १६ एप्रिल रोजी गुरुदेव तिरुपूर येथील डायमंड ज्युबिली पार्क आश्रम येथे पोहोचले. १८ तारखेला स. ७.३० वा. त्यांनी रविवार सत्संगाचे संचालन केले. यावेळी ३००० पेक्षा जास्त अभ्यासी उपस्थित होते. संध्याकाळी त्यांनी चेट्टीपलायम येथील योगाश्रमला भेट दिली. आश्रमाची व गुरुदेवांच्या कुटिराची घेण्यात येणारी काळजी बघून त्यांनी समाधान व्यक्त केले. थोडा काळ थांबल्यानंतर ते डि.जे.पार्क येथे परत आले.

दि. १९ एप्रिलला संध्याकाळी गुरुदेवांनी तिरुपूरपासून ३० कि.मी. दूर असणाऱ्या कनगेयम आश्रमास भेट दिली. तेथील वातावरण अतिशय सुंदर होते व ध्यानगृहाच्या बाहेर असणाऱ्या कडूलिंबाच्या झाडाच्या सावलीत त्यांनी उपस्थित अभ्यासींना सिटींग दिली. यावेळी आजुबाजुच्या केंद्रांमधून सुमारे ३०० अभ्यासी उपस्थित होते.

दि. २३ एप्रिल रोजी आश्रमात एकत्र झालेल्या ३००० अभ्यासींसाठी गुरुदेवांनी रविवार सत्संगाचे संचालन केले. ते रोज संध्याकाळी बगीच्यात बसत असत व रम्य निसर्ग व वाऱ्याच्या झुळकीचा आनंद घेत असत.

गुरुदेव तेथे असतांना बाबूजींच्या जन्मदिवस समारोहाची तयारी जोरात सुरु होती. इतर केंद्रातील स्वयंसेवक समारोहस्थळ तयार करण्यासाठी झटत होते. १५००० माणसांच्या क्षमतेचे ध्यानगृह उभारण्यात आले होते.

दि. २९ एप्रिल ते १ मे यादरम्यांन पू. बाबूजी महाराजांचा जन्मदिवस समारोह अतिशय पवित्र वातावरणात उत्तमरित्या पार पडला. यावेळी डि.जे.पार्क अतिशय भव्य दिसत होते. गुरुदेवांच्या व्यासपीठासह संपूर्ण ध्यानगृह फुलांनी सजवले होते. येथे जमलेल्या सुमारे ९००० अभ्यासींकरिता गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले. सत्संगानंतर त्यांनी पुस्तके, सी.डी व डि.व्ही.डी. चे विमोचन केले.

३० तारखेला संध्याकाळी गुरुदेवांनी संध्याकाळी ५.१५ वा. सत्संगाचे संचालन केले. त्यानंतर ते पुणे केंद्राच्या (महाराष्ट्र राज्य) अभ्यासींना भेटले व गुरुदेवांचे लक्ष त्यांच्याकडे वेधून घेण्यासाठी अभ्यासींच्या अपेक्षांवर चर्चा केली. यावेळी ते म्हणाले की गुरुदेवांच्या सान्निध्यात असतांना अभ्यासींनी अहंकाररहीत होणे आवश्यक आहे तसेच त्यांच्याकडून कुठल्याही अपेक्षा करता कामा नये.

दि. ५ मे ला सकाळी गुरुदेव कोयम्बतूर आश्रमात गेले व तेथे स. ९ वा. सत्संगाचे संचालन केले. १००० पेक्षा जास्त अभ्यासींनी या सत्संगात भाग घेतला.

संध्याकाळी ते कोयम्बतूर आश्रमातून निघाले व मलमपूझ्झा येथे पोहोचले. मलमपूझ्झा येथील हवामान ऊष्ण व दमट होते. एक रात्र मलमपुझ्झा येथे राहून दुसऱ्या दिवशी सकाळी नाश्ता करुन निघायचे अशी योजना आखून गुरुदेव मलमपूझ्झा आश्रमांत पोहोचले. दुसऱ्या दिवशी सकाळी, हत्तीसंबंधी काही अडचणींमुळे रस्ते पूर्णत: बंद होते व संपर्क पूर्णपणे तुटला होता. यामुळे गुरुदेवांना त्यांचा मुक़्काम वाढवावा लागला. ते म्हणाले “माझ्या साहेबांची (बाबूजी) ईच्छा आहे की मी येथे रहावे.”

दि. ७ मे रोजी गुरुदेव तिरुपूरला परत आले व दि. ९ ला सकाळी त्यांनी डि.जे.पार्क येथे उपस्थित असलेल्या सुमारे १५०० अभ्यासींसाठी रविवारच्या सत्संगाचे संचालन केले.

दि. १० मे रोजी गुरुदेवांनी त्यांना भेटण्यासाठी विवीध केंद्रांच्या अभ्यासींना आमंत्रित करण्याचे ठरवले. त्यानुसार राजपलायम, स्रिविलीपूथुर, हैद्राबाद या केंद्रांना तसेच मदुराई विभागातील सर्व केंद्रांना आमंत्रित करण्यात आले यामुळे ११ मे नंतर डि.जे.पार्क येथे मोठ्यासंख्येने अभ्यासी एकत्र झाले.

दि. ११ मे पासून ते १६ मे पर्यंत गुरुदेवांनी रोज सकाळी ६.३० वा. सत्संगाचे संचालन केले. वेगवेगळ्या केंद्रातील सुमारे १५०० अभ्यासी यावेळी उपस्थित होते. १६ तारखेला संध्याकाळच्या सत्संगानंतर गुरुदेवांनी गेले काही दिवस त्यांच्यासोबत असलेल्या सर्व अभ्यासींचे आभार मानले व या सत्राचा आपल्या भाषणाने समारोप करतांना त्यांनी सर्वांना प्राणाहुतीद्वारे दिले गेलेले धन नियमीत साधनेद्वारे व १० नियमांचे पालन करुन आपल्या ह्रुदयामध्ये जतन करुन ठेवण्यास सांगितले. आपल्या भाषणाच्या शेवटी गुरुदेवांनी सर्वांना आश्वस्त केले की याप्रकारची सत्रे (गुरुदेवांबरोबर सतत सत्संग) पुढे भविष्यातही सुरुच रहातील व अधिकाधिक ग्रहण करण्यासाठी तयार ह्रुदये घेऊन येण्यासाठी सर्वांना आशिर्वाद दिले.

१९ तारखेला, तिरुपूरला एक महिन्यापेक्षा जास्त काळ व्यतित केल्यावर गुरुदेव दुपारी कोयम्बतूरला रवाना झाले. तेथे त्यांनी एका अभ्यासीच्या घरी मुक़्काम केला व दुसऱ्या दिवशी सकाळी सत्संगाचे संचालन केले.

मलमपूझ्झा




जुलै २०१० खंड ३ अंक ४

श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र


कोयम्बतूर


लालाजी मेमोरिअल शाळेच्या विद्यार्थी सह


चेन्नई

## चेन्नई येथे पुनरागमन

दि. २१ मे रोजी स. ११:३० वा. पूज्य गुरुदेवांचे चेन्नईला आगमन झाले. पुढील ३ आठवडे त्यांचे 'गायत्री' व मणपक्कम आश्रमात येणे–जाणे सुरु होते. दि. २३ रोजी मोठ्या कालखंडानंतर मिळालेल्या पहिल्याच रविवार सत्संगामुळे चेन्नई केंद्राचे अभ्यासी हर्षभारित झाले होते. ते घरी रहात असतांना पू. गुरुदेवांनी उपस्थितांसह 'मरिना बीच'ला काही वेळेस भेटी दिल्या व तेथील शांत व निशब्द संध्याकाळचा आनंद घेतला.

लालाजी मेमोरिअल ओमेगा इंटरनॅशनल स्कूलच्या दहावीच्या विद्यार्थ्यांनी शालांत परिक्षेत चांगले गुण मिळवून शाळेला १००% निकाल मिळवून दिला. त्यांनी मिळवलेल्या या उज्वल यशाचे अभिनंदन करण्यासाठी पू. गुरुदेवांनी दि. २८ मे रोजी शाळेला भेट दिली. ती संध्याकाळ वातावरणात असलेल्या आनंदी भावनांनी व सरळ सोप्या व प्रवाही संभाषणाने उल्लेखनीय ठरली.उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित करतांना जीवनामध्ये जास्तीत जास्त मिळविण्याचे महत्व विशद करितांना पूज्य गुरुदेव म्हणाले “मी नेहमीच मुलांना वर्गामध्ये प्रथम न येण्याविषयी सांगतो. जर तुम्ही नेहमीच पहिले येत असाल तर प्रत्येक वेळी लोक तुमच्याकडून काहीतरी अधिक मिळविण्याची अपेक्षा करतील. आमच्या वेळेस क्रमांक नव्हते व विषयाचे खरे ज्ञान असण्याला महत्व होते”. संपूर्ण जीवन जगण्याची गरज समजावून सांगतांना ते म्हणाले की एखाद्याचे नुसते शिक्षण अथवा कारकीर्द महत्वाचे नाही तर त्याची दानशूरता, निकोप नातेसंबंध, चांगली वागणूक व एकंदरीत आनंद हे ही तितकेच महत्वाचे आहेत.

दि. ६ जून रोजी पू. गुरुदेवांनी सत्संगानंतर आठ लग्ने लावली व संपूर्ण दिवस अभ्यासींच्या भेटीगाठी घेण्यात व्यतीत केला. दि. ७ रोजी आंध्रप्रदेशातील कुर्नुल केंद्राचे सुमारे १५० अभ्यासी काही दिवस गुरुदेवांसमवेत रहाण्यासाठी आले होते. दैनिक कामांमध्ये थोडासा बदल म्हणून गुरुदेव त्या दिवशी रुची कॅफेमध्ये, (आश्रमात असणारे उपहारगृहामध्ये), सोबत असणाऱ्या अभ्यासींसमवेत रात्रीचे जेवण घेण्यासाठी गेले . त्या संध्याकाळी प्रत्येकानेच शिस्तबद्धरित्या त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा आदर राखत त्यांच्यासमवेत असण्याचा आनंद घेतला. अशीच शिस्तबद्धता तेव्हाही दिसुन आली जेव्हा पू. गुरुदेव त्यांच्या घरुन आश्रमात परत आलेत आणि त्यांनी दक्षिण आंध्रप्रदेशमधून आलेल्या सुमारे १२०० अभ्यासींना आश्रमामध्ये संयमीपणे त्यांच्या अभिवादनासाठी वाट बघतांना पाहिले. संध्याकाळी आश्रमांत फेरी मारतांना त्यांनी नवीन ऑडिटोरिअमच्या बांधकामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. मणपक्कम येथे दुरुन आलेल्या अभ्यासींच्या फायद्यासाठी त्यांनी पुढील तीन दिवस ध्यानगृहामध्ये सतत सत्संगाचे संचालन केले.

दि. १२ रोजी आंध्रप्रदेशातील सुमारे ६० अभ्यासींचे त्यांनी आपल्या निवासस्थानी स्वागत केले व शांतपणे त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली व दुपारच्या जेवणानंतर त्यांना निरोप दिला. १३ तारखेला स. ७.३० च्या सत्संगासाठी सुमारे ५००० जण उपस्थित होते. या सत्संगानंतर गुरुदेवांनी दोन लग्नांचे संचालन केले. अभ्यासींशी अनौपचारिक गप्पा मारतांना गुरुदेव ईश्वरीय जाणीवेबद्दल म्हणाले “प्रत्येक अभ्यासीला ध्यान करतांना वेगवेगळे अनुभव येऊ शकतांत व ते सर्वच बरोबर असतांत कारण ते ईश्वरी तत्व स्वत:मधे व आपल्यामधे एकतानता निर्माण करीत असते व आपल्याबरोबर एकमेवाद्वितीय असे नाते तयार करीत असते. हे तेव्हा होते जेव्हा सर्वजण ईश्वरासोबत एकतानता निर्माण करतात जसे ट्युनिंग फोर्क विणेच्या तारांसमवेत संपूर्ण एकतानता निर्माण करते त्यावेळी खरी ईश्वरियता प्राप्त करता येते” या संभाषणामध्ये उपस्थित सर्वजण एकदम मग्न झाले होते. यानंतर उपस्थितांसाठी एक सिटींग दिली गेली.

## नवीन जबाबदाऱ्या

| | |
|---|---|
| बंधू के.टी.मंजुनाथ | संचालक, रिट्रीट सेंटर पानशेत पुणे. |
| बंधू डॉ. ए. पेरुमल | संचालक, क्रेस्ट, बंगलोर. |

### विभागीय प्रमुख

| | |
|---|---|
| बंधू शेषाद्री वेंकटाद्री | कर्नाटक दक्षिण |
| बंधू टी.व्ही.विश्वनाथ राव | तामिळनाडू दक्षिण |
| बंधू मनोज तिवारी | बिहार व झारखंड |
| बंधू एस. प्रकाश | तामिळनाडू उत्तर |

### केंद्र प्रमुख

| | |
|---|---|
| बंधू प्रभाकर राऊरी | बंगलोर |
| बंधू शेखर रॉय | भुवनेश्वर |

### क्षेत्रिय प्रमुख

| | |
|---|---|
| बंधू प्रसन्ना कृष्णा | ओशियानिया |
| बंधू एन.एस.नागराज | युरोप |
| बंधू शरत हेगडे | अफ्रिका खंड व हिंद महासागर बेटे |
| बंधू नितीन गोविल्ला | अतिपूर्व व दक्षिण पूर्व अशिया |
| बंधू विनोद मिश्रा | चीन |
| बंधू विलीयम वायकॉट | लॅटीन अमेरीका व कॅरेबीयन बेटे |
| बंधू संतोष श्रीनिवासन | कॅनडा व अमेरीका |
| बंधू श्रीधर कदांबी | पुर्व सी.आय.एस. देश |
| बंधू आशिष सिंह | दक्षिण अशिया |

(श्रीलंका, भूतान, पाकिस्तान, नेपाळ व बांग्लादेश)

## भूतकाळाचे पुनरावलोकन

सन १९७२ मध्ये पूज्य बाबूजी महाराजांबरोबर आंतरराष्ट्रीय दौऱ्यावर असताना गुरुदेवांनी केलेल्या अत्यंत दक्ष व जागरुक नोंदींवर आधारित 'पश्चिमेतील भारत' हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. या प्रवासाची ही एक झलक

इजिप्त  दिल्ली येथे जाण्याकरिता दिनांक १६ एप्रिल १९७२ रोजी बाबूजी शहाजहानपूरहून निघाले. २० एप्रिल रोजी ते चारीजी सोबत मुंबईला गेले जेथून दुसऱ्या दिवशी त्यानीं कैरोसाठी  प्रस्थान केले.

इटली  ९ दिवस रोम येथे राहून गुरुदेवांनी अनेक अभ्यासींच्या भेटी घेतल्या, ते त्यांच्या घरी गेले, इच्छुकांना प्रारंभिक सिटींग दिली, त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली व नवीन प्रशिक्षकांची नियुक्ती केली. तेथे जमलेल्या समुदायासमोर 'सहज मार्गाच्या प्रकाशात धर्म व आध्यात्मिकता' या विषयावर एक भाषण दिले.

फ्रान्स २९ एप्रिल  नाईस, मारसिलीस, ले बुसेट व पॅरिस अशा अनेक ठिकाणी गुरुदेवांनी प्रवास केला. एक दिवस पूज्य बाबूजी एका लामा गुरुंपाशी काही वर्षे व्यतीत केलेल्या फ्रेंच गृहस्थाशी वार्तालाप करीत होते. आपला तिसरा नेत्र उघडण्याची शस्त्रक्रिया त्या गृहस्थांनी स्वत:वर करून घेतली होती. माझा अभ्यास करून तुम्हाला काय वाटते ते सांगा असे गुरुदेवांनी या व्यक्तीला सांगितले. 'आपले गुरुदेव सतत आपल्या सन्निध आहेत' असे या फ्रेंच गृहस्थांनी बाबूजींना सांगितले. बाबूजी त्यांच्या मताशी सहमत झाले. त्यानंतर या व्यक्तीने बाबूजींना प्राणाहुती दिली. गुरूदेवांनी त्यांचे अनुमोदन केले. या गृहस्थांची तळमळ व स्वत:च्या गुरुदेवांप्रती असणारा आदर यामुळे बाबूजी अत्यंत प्रभावित झाले व याबद्दल त्यांनी अनेकदा प्रशंसोद्गार काढले.

डेन्मार्क  कोपेनहेगेन येथे आगमन झाल्यावर उपस्थित अभ्यासींनी बाबूजींचे व गुरुदेवाचे भव्य स्वागत केले.

१२ मे रोजी डॅनिश रेडिओने बाबूजींची मुलाखत घेतली, ज्यामध्ये चारीजींनीही काही मुद्द्यांचे स्पष्टीकरण दिले. बाबूजींची भेट घेण्याकरिता इतर देशांतूनही अभ्यासी आले होते. स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन सहज मार्गाची ओळख करून देण्याकरिता लोकांचे मेळावे आयोजित करण्यात आले होते, ज्याकरिता सुमारे ३०० व्यक्ती उपस्थित होत्या.



## व्हि.बी.एस.ई. प्रशिक्षण कार्यक्रम, चेन्नई

दक्षिण विभागातील अभ्यासींकरिता एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात बाबूजी मेमोरिअल आश्रम येथे तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १२ शिक्षक व ३ मुख्याध्यापक यांसह ७५ अभ्यासींनी अत्यंत उत्साहाने याचा लाभ घेतला. लालाजी मेमोरिअल इन्टरनॅशनल स्कूल व एस.एम.आर.टी.आय. यांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आलेल्या अभ्यासक्रमावर यावेळी चर्चा झाली. अभ्यासक्रमाचे विभाग, विद्यार्थ्यांकरिता परिक्षा–प्रत्रके व पालकांकरिता प्रतिसाद पत्रके यावर आपली मते नोंदविण्यास उपस्थितांना सांगण्यात आले. सहभागींनी पुरवलेल्या सामुग्रीमुळे ही कार्यशाळा फलदायी ठरली.

अभ्यासक्रम तयार करण्याचे काम सुरू असून प्राथमिक अभ्यासक्रम लवकरच तयार होईल अशी अपेक्षा आहे.

## व्हि.बी.एस.ई. उन्हाळी कार्यक्रम, भोपाळ

८ व ९ मे रोजी भोपाळ केंद्राने २ दिवसीय व्हि.बी.एस.ई. उन्हाळी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. एकूण ७६ मुलांपैकी २६ मुले अभ्यासी नसलेल्या कुटुंबांतील होती.

पहिल्या दिवशी गुलाब–पुष्पे देऊन मुलांचे स्वागत करण्यात आले. 'स्वत:ला व्यक्त करा' या कार्यक्रमा–अंतर्गत मुलांना स्वत:ची ओळख करुन देण्यास सांगण्यात आले. चांगल्या व वाईट सवयींवर आधारित एका नाटकाचा प्रयोग या वेळी झाला, तो मुलांनी लक्षपूर्वक पाहिला. ईश्वर, गुरू व आपल्या आत असणारा परमेश्वर या कल्पनांची मुलांना छोट्या कार्यक्रमातून माहिती देण्यात आली. नाव/बोट बनविणे व ओरिगामी याचाही मुलांनी आनंद घेतला.

दुसऱ्या दिवशी 'निसर्गाशी जवळीक' या कल्पने–अंतर्गत हवा, पृथ्वी, अग्नि, जल आणि अवकाश या पाच मूल–तत्वांची मुलांना माहिती देण्यात आली. वेळेचे नियोजन, अंत:करणाचे शुद्धिकरण, कठपुतळीच्या बाहुल्या वापरून विविध परिस्थितीत कसे वागावे याचे प्रशिक्षण, ओरिगामी वस्तू व मूल्य जाणीव, पाण्याच्या बचतीबद्दलचे सादरीकरण,बंधुत्व व अनेकविध वस्तूंमध्ये लपलेली मानवी मूल्ये ओळखणे असे अनेक कार्यक्रम यावेळी झाले. प्रत्येक मुलाला भाग घेता यावा म्हणून छोटे नाट्क, बडबडगीत, गाणे किंवा समूह–गीत सादर करण्यास त्यांना सांगण्यात आले. सकाळी उठल्यावर व रात्री निजण्यापूर्वी मिशनची प्रार्थना करण्याची विनंती मुलांना करण्यात आली. केंद्र–प्रमुख बंधु प्रभाकर दास यांच्या निरोपाच्या भाषणाने व सहभागींना भेटवस्तू देऊन या कार्यक्रमाची सांगता झाली.



# व्हि.बी.एस.ई. कार्यक्रम

मुझफ्फरपूर केंद्राच्या विविध उप–केंद्रांमध्ये दि. १२ ते १७ एप्रिल २०१० दरम्यान व्हि.बी.एस.ई. कार्यक्रम व खुल्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. डेहराडून येथील श्री. आर.एस. चौहान, लेफ़्ट. कर्नल डॉ. मनू चोप्रा, गाझियाबाद येथील भगिनी चंद्रकाता, मुझफ्फरपूर येथील श्रीमती मधु रोहिला, कर्नल अनिल कुमार व केंद्र–प्रमुख संजीव भारती यांचा संचालक संघामध्ये समावेश होता. ह्या कार्यक्रमाची परिणामकारकता वाढविण्यासाठी संचालक संघाने महाविद्यालयीन प्राध्यापक, शिक्षक व सैन्यातील अधिकारी यांच्याबरोबरही संवाद साधला.



दि. १२ एप्रिल रोजी बिहार व झारखंड विभागाचे प्रमुख श्री. जी. एम. भटनागर यांच्या उपस्थितीत व्हि.बी.एस.ई. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्राचा पाटणा येथे शुभारंभ झाला. बिहारमधील विविध केंद्रांतून आलेल्या सुमारे ५० अभ्यासींनी याचा लाभ घेतला.

दि. १३ एप्रिल रोजी मुझफ्फरपूर येथील दयालु सिंग महाविद्यालय येथे एक कार्यक्रम करण्यात आला.

दि. १४ एप्रिल या दिवशी भारतीय सैन्यातील १५१ आय.एन.एफ़.बि.एन.(टि.ए.) जाट या तुकडीकरिता भगिनी चंद्रकांता व भगिनी मधु रोहिला यांनी व्हि.बि.एस.ई.चे उदाहरणांसहित स्पष्टीकरण दिले. या वेळी सुमारे १२५ व्यक्ती उपस्थित होत्या.

१५ एप्रिल रोजी होली मिशन सिनीयर सेकंडरी विद्यालयातील शिक्षकांशी फलदायी चर्चा हा संचालक संघासाठी एक चित्तवेधक अनुभव होता. कर्नल अनिल रोहिला यांनी आध्यत्मिकतेचा अर्थ उपस्थितांना विषद केला.

डी.ए.वी. पब्लिक स्कूल येथे १६ एप्रिल रोजी आयोजित केलेल्या व्हि.बि.एस.ई. प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ सुमारे ५० शिक्षकांनी घेतला.

मुझफ्फरपूरपासून ११० कि.मी. अंतरावर असणाऱ्या मधुबनी येथे १७ एप्रिल रोजी ओपन हाऊस सत्राचे आयोजन करण्यात आले होते. व्हि.बी.एस.ई. प्रशिक्षण घेणारे सुमारे ६० शिक्षक यात सहभागी झाले होते.

५ ते १३ वर्षे वयोगटासाठी तिसऱ्या, एक महिन्याच्या व्हि.बी.एस.ई. प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन जामनगर केंद्राने केले होते. ८० मुलांचा यात सहभाग होता त्यापैकी सुमारे ४० मुले नियमीतपणे येत होती. गुरुदेव, ईश्वर, प्रेम, प्रार्थना, शिस्त व विनम्रता अशा विविध मुद्द्यांचा या कार्यक्रमात परामर्श घेतला गेला. दररोजच्या प्रार्थनेनंतर मुलांना त्यांच्या आवडीचा खेळ खेळण्यास अनुमती देण्यात आली.

या कार्यशाळेच्या समारोपाच्या सत्रात सहभागी मुलांच्या पालकांना ध्यान–कक्षामध्ये आमंत्रित करण्यात आले होते. मुलांनी सादर केलेले विविध कार्यक्रम बघण्याकरिता सुमारे १०० व्यक्ती उपस्थित होत्या. सौंदर्य व जबाबदारी यांचे प्रतीक असणारी गुलाबाची रोपे यावेळी सहभागी झालेल्या मुलांना भेट म्हणून देण्यात आली. मुलांच्या दूरदर्शन पहाण्याच्या वेळेत झालेली कपात, सकाळी, रात्री व भोजनापूर्वी प्रार्थना म्हणण्याची सवय वाढीस लागल्याचे पालकांनी यावेळी सांगितले.

मध्य प्रदेशातील विदिशा केंद्राने १५ व १६ मे रोजी दोन दिवसीय व्हि.बी.एस.ई. प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले होते. पहिल्या दिवशीच्या कार्यक्रमात 'ईश्वर व गुरुदेव' तसेच 'विनम्र रहा आणि दुसऱ्यांप्रति आदराने वागा' या विषयांचा समावेश होता. भगिनी अंजली व बंधू प्रमोद या दोघांनी स्वयंसेवकांच्या संघाबरोबर अनेकविध प्रहसन, खेळ व वैज्ञानिक प्रयोगांच्या आधारे हे गुण उपस्थितांपर्यंत पोहोचवले. दुसऱ्या दिवशी 'अनुशासन' ह्या विषयाला केंद्रस्थानी ठेऊन अनेक छोट्या कार्यक्रमांद्वारा त्याचे महत्त्व उपस्थितांना विषद करण्यात आले. निरोगी शरीराचे महत्त्व मुलांच्या मनावर ठसविण्याकरिता त्यांना योगासनेही शिकविण्यात आली.

## जावरा



जावरा, इंदोर येथे जैन तरुण संघाने आयोजित केलेल्या ९ दिवसांच्या निवासी कार्यक्रमामध्ये १२ व १३ मे रोजी व्हि.बी.एस.ई. कार्यक्रम संपन्न झाला.

१० स्वयंसेवकांच्या संघाने, ५ सत्रांमध्ये विभागलेला हा कार्यक्रम निवासी कार्यक्रमाच्या शेवटच्या दोन दिवसात सादर केला. प्रेम, आदर, परस्पर संवाद व ऐकण्याची कला, सहकार्य आणि देवाण–घेवाणीची वृत्ती या पाच मूल्यांवरती या सत्रांमध्ये भर देण्यात आला. 'स्वत:च्या दृष्टीकोनातून मूल्यांचे महत्त्व', 'आजूबाजूच्या परिस्थितीत मूल्यांचे महत्त्व' व 'गुरुदेवांप्रति मूल्यांचे महत्त्व' या विषयांवर तीन सत्रांमध्ये चर्चा झाली.

१३ ते १६ या वयोगटातील सुमारे ४० मुलांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. उदाहरणे व प्रयोग यांची रेलचेल असणाऱ्या पहिल्या सत्राचे संचालन भगिनी यामिनी करमरकर व बंधू राजेश रावेरकर यांनी केले. केवळ मूल्येच आपल्याला विकास, आनंद व विवेकाकडे घेऊन जातात असे मत या कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी मुलांनी व्यक्त केले.

आपल्या शरीराशी संवाद व त्याच्या सहमतीने चांगली प्रकृति, योग्य प्रवृत्ति, अपयश हा यशाचा पाया असणे, मध्यम–मार्ग अनुसरणे, मोठ्यांप्रति आदर, परस्पर संवाद, सहकार, दुसऱ्यांप्रति आस्था असणे व देवाण–घेवाण या

विषयांवर प्रायोगिक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. गोष्टी, नाटुकली, शास्त्रीय प्रयोग यांच्या मदतीने बंधू शेखर शर्मा, भगिनी प्रीति शर्मा व भगिनी विनीता रावेरकर यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले. हास्य व अश्रू यांनी परिपूर्ण अशा या कार्यक्रमाने हे संदेश श्रोत्यांपर्यंत उत्तम प्रकारे पोहोचवले.

'परमेश्वराप्रति मूल्ये' हा तिसऱ्या सत्राचा विषय होता. ईश्वराचे वास्तव्य आपल्यामध्ये आहे. त्यामुळे, ईश्वराप्रति आपल्याला जे प्रेम व आदर वाटतो तो इतर प्राणीमात्रांप्रति सद्भावना, ममता तसेच निसर्गाच्या स्त्रोतांचा योग्य उपयोग यामध्ये प्रतिबिंबित झाला पहिजे. कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी मुलांना चार गटात विभागण्यात आले व दिलेल्या विषयांवरच्या त्यांच्या भावना श्रोत्यांसमोर मांडण्यासाठी सांगण्यात आले. बंधू विनोद साठे, बंधू श्रीराम द्रविड व बंधू राजेश यांनी या सत्राचे संचालन केले.

आपल्या आयुष्यात कोणते बदल घडावेत असे आपल्याला वाटते? याची सूची तयार करण्यास मुलांना सांगण्यात आले. मुद्दे लहान असूनही अत्यंत व्यवहार्य होते. मुलांकडून मिळालेल्या प्रतिसादाने स्वयंसेवकांना अत्यंत आनंद झाला.

समारोपाच्या सत्रामध्ये संचालक मंडळाचे सदस्य व शहरातील काही समाज-सेवकांना आमंत्रित करण्यात आले होते. बंधू राजेश यांनी यावेळी मिशनबद्दल माहिती सादर केली.

## प्रकाशाची नवीन केंद्रे

### कासरगोड, केरळ

2 मे 2010 रोजी कासरगोड केंद्रातील ध्यान-कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. जानेवारी 2007 मध्ये कासरगोड केंद्राची स्थापना झाली होती. उत्तर केरळमधील कासरगोड शहरापासून 16 कि.मी. अंतरावर असणाऱ्या 'बेला' या ठिकाणी हे केंद्र कार्यरत आहे. ध्यान-कक्षाची जागा एका डोळ्यांच्या रुग्णालयात आहे. या रुग्णालयातील बहुतेक कर्मचारी अभ्यासी आहेत.

पय्यानूर येथील विभाग-प्रमुख बंधू टी.व्ही. कुन्हीकन्नन यांनी सकाळी 7.30 वाजता सुमारे 60 अभ्यासींकरिता सत्संगाचे संचालन केले. यानंतर उद्घाटन शिलेचे अनावरण करण्यात आले. यावेळी निमंत्रितांची भाषणे झाली व कर्मचारी व लहान मुलांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

बंधू टी.व्ही. कुन्हीकन्नन यांनी 'हे केंद्र आध्यत्मिकता व भौतिकता या दोघांमधील समतोलाचे प्रतीक आहे' असे उद्गार काढले. रुग्णालयाचे अध्यक्ष बंधू श्री. नीलकांतन ह्यांनी आपल्या भाषणात योग्य प्रकारे जगण्याचे मोल, स्वच्छतेचे महत्त्व व पर्यावरणाबद्दलची नीतितत्वे यावर विवेचन केले. 'मानवी आयुष्यातील सेवेचे महत्त्व' या विषयावर बंधू जयशंकर (ॲड. कमिशनर-इन्कम टॅक्स- नागपूर) यांनी आपले विचार मांडले. बंधू उमेश (संचालक), बंधू डॉ. एन. सुनिल (प्रशिक्षक व रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक), डॉ. के. नारायणन (वैद्यकीय सल्लागार), श्री. फिलिपोस (संचालक- सेवाना ट्रेडर्स) यांचीही या प्रसंगी भाषणे झाली. गुरुदेवांचे प्रेम आणि आशीर्वाद यांची प्रचिती उपस्थितांना क्षणो-क्षणी येत होती.

### तितोडी, सौराष्ट्र






पूज्य गुरुदेवांच्या कृपाप्रसादाने गेल्या 2/3 महिन्यात सौराष्ट्रातील जामनगर ते द्वारका या पट्टयात मिशनच्या कार्यक्रमाची सातत्याने वृद्धी होत आहे. खंबालियाजवळ असणाऱ्या तितोडी या ठिकाणाला विभाग-प्रमुख बंधू राजेश अगरवाल यांनी रविवार 13 जून रोजी भेट दिली. यावेळी केवळ 7 नियमीत अभ्यासी या केंद्रामध्ये होते. अनियमीत अभ्यासींशी संपर्क साधण्याची विनंती यावेळी नियमीत अभ्यासींना करण्यात आली. आता गुरुदेवांच्या कृपेने सुमारे 20 अभ्यासी रविवारच्या सत्संगाकरिता उपस्थित राहतात. खंबालियाचे विभाग-प्रमुख बंधू भाविन पटेल यांनी गुजरातच्या विभाग प्रमुखांच्या व 25 अभ्यासींच्या उपस्थितीत ध्यान-कक्षाचे उद्घाटन केले. 2500 लोकसंख्येचे तितोडी हे एक छोटे गाव असून येथे मिशनचे केंद्र गेल्या तीन वर्षांपासून आहे.

### जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जामनगर, गुजरात येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम

जामनगर येथील वैद्यकीय महाविद्यालयात शिकणाऱ्या तरूण अभ्यासींनी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपणाची मोहीम हाती घेतली होती. जामनगर केंद्राचे विभाग-प्रमुख बंधू सचिन व्यास यांच्या उपस्थितीत वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरात झाडे लावण्यात आली. जामनगर महापालिकेचे सदस्य- श्रीमति हर्षिदा पंड्या, श्रीमति सहारा मकवाना व भगिनी सगोया यांना सायंकाळी आमंत्रित करण्यात आले होते. सुमारे 40 बालके व त्यांचे पालक या प्रसंगी प्रोत्साहन देण्याकरिता उपस्थित होते.







# अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम

## ग्वालियर



गुरूदेवांच्या कृपेने ग्वालियर केंद्रामध्ये दि. १४ ते १६ मे या कालावधित अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी ग्वालियर व जवळपासच्या केंद्रांमधून ३१ अभ्यासी हजर होते.

सर्व अभ्यासी १४ मे ला हजर झाले आणि व्यक्तिगत सिटींग घेऊन प्रत्येकजण तयार झाला. संध्याकाळी ७:०० वाजता सत्संग झाला. अभ्यासींसाठी एक स्वागतपर भाषण झाले व त्यानंतर प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश व मार्गदर्शक तत्वे एका नाटकाद्वारे सादर करण्यात आली.

दि. १५ मे च्या पहिल्या सत्रात "ध्येय ठरविण्याचे महत्व" आणि "ध्यान व सामूहिक सत्संग" यावरील व्याख्यानांचा समावेश होता. त्यानंतर सादर केलेल्या विषयांवर सामूहिक चर्चा व प्रश्नोत्तरांचे सत्र झाले. दुसऱ्या सत्रात "शुद्धीकरण" आणि "रोजनिशी लिखाण" या विषयांवरील व्याख्याने, सामुहिक चर्चा आणि प्रश्नोत्तरे ह्यांचा समावेश होता. तिसरे सत्र "दहा नियम" यावर होते. त्यात एक व्याख्यान व सामुहिक चर्चासत्राचा समावेश होता यात पहिले तीन नियम घेण्यात आली.

दि. १६ मे ला पहिले सत्र मागील दिवसाच्या सत्रापासून पुढे सुरू करण्यात आले आणि त्यात शेवटच्या सात नियमांचा समावेश होता. दुसऱ्या सत्रात "प्रार्थना" आणि "सतत स्मरण" या विषयांवरील व्याख्याने, सामूहिक चर्चा व प्रश्नोत्तरांचा समावेश होता. तिसऱ्या सत्रात "प्रेम आणि कृतज्ञता" यांचा समावेश होता.

प्रत्येक दिवसाची सुरूवात पहाटे ४:०० वाजता सकाळचे ध्यान, आत्मपरिक्षण, साहित्य वाचन आणि शांतता याने होत होती. संध्याकाळी व्यक्तिगत सिटींग, शुद्धीकरण, वैश्विक प्रार्थना आणि भजन असे.

## दिल्ली

अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम – प्राथमिक स्तर, आर के पुरम आश्रम, दिल्ली केंद्रामध्ये दि. २३ मे २०१० ला आयोजित केला होता. दिल्ली आणि गुरगांव केंद्रांमधून एकूण ३६ अभ्यासी या कार्यक्रमात सहभागी झाले होते. याचे सादरकर्ते होते बंधू ज्ञान सरीन. रविवारच्या सत्संगानंतर जवळ जवळ सकाळी ९:३० वाजता या सत्राची सुरूवात झाली व दुपारी २:३० पर्यंत सुरू होते. सर्वांनी ह्याला खूपच चांगला प्रतिसाद दिला. सहभागी अभ्यासी म्हणाले कि त्यांना या कार्यक्रमामुळे अगदी अल्पश्या काळात सहजमार्गाची बहुव्यापकता समजण्यास मदत झाली आहे. सादरीकरणाच्या कल्पनेचे सुद्धा सर्वांनी कौतुक केले.

## मिर्झापूर, उत्तर प्रदेश

विभागीय प्रमुख बंधू श्यामजी मेहरोत्रा यांच्या विशेष प्रयत्नांनी मिर्झापूर केंद्रामध्ये प्रथमच अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रशिक्षक बंधू सुरेशकुमार त्रिपाठी यांच्या घरी दि. ६ जून रोजी मिर्झापूर



केंद्राच्या ३२ अभ्यासींनी या कार्यक्रमाला हजर राहून अध्यात्मिक लाभ मिळवला. कानपूर केंद्राच्या भगिनी अंजु श्रीवास्तव व लखनौ केंद्राचे बंधू सुलभ सोनी हे या कार्यक्रमाचे सादरकर्ते होते. नवीन अभ्यासींच्या अडचणी सोडवण्यासाठी व जे अभ्यासी ही संस्था कशी चालवली जाते, तिची कार्यपद्धती काय आहे हे जाणण्यास अति उत्सुक आहेत त्यांच्यासाठी केलेल्या या कार्यक्रमात युवा पक्षाच्या सदस्यांचा सक्रिय सहभाग होता.

अभ्यासीला सहजमार्गाच्या प्रत्येक पैलूचे नीट आकलन झाले तर ते त्यांच्या आत्मोन्नतीसाठी फायद्याचे ठरेल म्हणून साधना, शुद्धीकरण व सतत स्मरण यांच्याशी संबंधित विषयांवरील विशेष चर्चेवर लक्ष केंद्रित करण्यात आले होते.

## नवीन अभ्यासींसाठी कार्यक्रम – इंदौर, मध्य प्रदेश

रविवार दि. २३ मे ला इंदौर केंद्रामध्ये नवीन अभ्यासींसाठी एक कार्यक्रम आयोजित केला होता. जवळ जवळ २५ नवीन अभ्यासींनी याचा लाभ घेतला. सहभागी अभ्यासींचे वेगवेगळे गट करण्यात आले होते ज्याचे संचलन प्रशिक्षकानीं केले. प्रत्येक अभ्यासीला साधना सुरू करण्याआधी सहजमार्गाच्या विविध पैलूंची सूक्ष्मता समजून घ्यायची होती. सत्राच्या शेवटी, आपल्या साधनेमध्ये आज्ञापालन करण्याची गरज असल्याचे सर्वांना जाणवले. शुद्धीकरण ध्यान यांच्या संबंधित विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली गेली. दहा सूक्ते समजून घेण्यावर भर दिला गेला व त्यावर सविस्तर चर्चाही झाली. आणि ही गोष्टही उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिली गेली की ह्या सगळ्यात प्रिय गुरूदेवांची मदत ही सर्वांत महत्वाची गोष्ट आहे.

## साधनेवर चर्चासत्र, तेनकासी, तमिळनाडू

दि.१३ जून रोजी तमिळनाडूच्या तिरुनेलवेली जिल्ह्यातील तेनकासी येथे "सहजमार्गाची साधना" या विषयावर एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले. तेनकासी हे लहान केंद्र असूनही पुलियांगुडी केंद्रातील ६ अभ्यासी मिळून २१ जणांनी त्यात सहभाग घेतला. सर्व अभ्यासींना ४ गटात विभागले गेले व प्रत्येक गटाला साधना आणि आध्यात्मिकता यावर आधारित विषय चर्चेला दिला गेला. शेवटी सर्वांना जाणवले कि सत्र संपेपर्यंत पूर्णवेळ सर्वजण गुरूदेवांच्या अमर्याद कृपेमधे बुडाले होते. बाबूजीमहाराजांनी जसे 'व्हिस्पर्स' मधे सांगितले आहे कि "आनंद कृपेला आकर्षित करतो" त्याचाच हा पुरावा होता. हे सत्र सर्व अभ्यासींना विचार करण्यास प्रवृत्त करणारे असे होते.

## दि. २४ जुलैच्या सोहोळ्याची तयारी, लखनऊ





## स्नेहसंमेलन, चिकमंगळूर, कर्नाटक



दि. २४ जुलै २०१० रोजी साजरा होणाऱ्या पूज्य गुरूदेवांच्या ८४व्या वाढदिवसाच्या सोहोळ्याची तयारी लखनऊ येथे जोरात सुरू आहे. लखनऊ आश्रमाच्या विस्तीर्ण परिसरात सर्वत्र बांधकाम चालू आहे. निवासी तंबू, स्वयंपाकघर आणि इतर गोष्टी साकारल्या जात आहेत. यावेळी नवीन ध्यानगृहाची उभारणी करण्यात आली आहे. रस्ते बांधणीचे काम अंतिम टप्यात आहे तर नवीन निवासकक्षाचे कामही अंतिम टप्यात आहे. उभारलेल्या नवीन भव्य प्रवेशद्वारामुळे आश्रमाला आकर्षक रूप प्राप्त झाले आहे. खूप मोठया संख्येनी येणाऱ्या अभ्यासींची संख्या विचारात घेऊन विविध बांधकामे आणि विकासकामे आकारास येत आहेत. स्वयंसेवकांचे चमू ठरविलेली कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी अहोरात्र झटत आहेत.

## प्रथमवर्ष वर्धापन सोहोळा, चिक्कनयकना हल्ली, कर्नाटक

दि. १३ जून २०१० रोजी कर्नाटक राज्यातील चिक्कनयकना हल्ली आणि हुलीयार ह्या केंद्रांनी त्यांचा पहिला वर्धापन दिन साजरा केला. सध्या चिक्कनयकना हल्ली केंद्रात ३५ तर हुलीयार केंद्रात २० अभ्यासी आहेत. हा प्रसंग साजरा करण्यासाठी, स्थानिक अभ्यासींनी एका पूर्णदिवसीय कार्यक्रमाचे आयोजन केले होते. तुमकूर, तिप्तूर, चिक्कनयकना हल्ली, आणि हुलीयार अशया विविध केंद्रांतून साधारण ७० अभ्यासी ह्या कार्यक्रमासाठी चिक्कनयकना हल्ली ह्या केंद्रात एकत्र जमले होते. “सहज मार्ग, एक जीवन पद्धत” हा विषय मांडतांना साधनेच्या विविध अंगाना अधोरेखित केले गेले. ह्यानंतरच्या सत्रात नवीन अभ्यासींनी आपले अनुभव सांगितले. ह्या कार्यक्रमाची सांगता संध्याकाळच्या सत्संगाने झाली व आपल्या पूज्य गुरूदेवांच्या स्मरणांत सर्व अभ्यासी आपआपल्या केंद्रांकडे रवाना झाले.

दि. ८ एप्रिल रोजी प्रशिक्षक बंधू आर. एस. सत्यनारायण यांनी त्यांच्या घरी चिकमंगळूरच्या सुमारे ४० अभ्यासींसाठी स्नेहसंमेलनाचे आयोजन केले होते. यावेळी कन्नड भाषेत भाषांतरीत केलेला “व्हिस्पर्स फ्रॉम द ब्राईटर वर्ल्ड (दिव्यलोकातील संदेश)” मधील एक संदेश वाचला गेला.

ल्जेवणानंतर भगिनी नागरत्ना, बंधू रामचंद्र, दिनेश गोखले, डॉ. सतिश, देवराज आणि भगिनी परिमला व राजम्मा यांनी सतत स्मरण व साधनेच्या योग्य अभ्यासामुळे त्यांना व्यक्तिगत आयुष्यामधे झालेला लाभ याविषयी त्यांचे अनुभव सांगितले. जमलेल्या अभ्यासींनी व्यक्त केलेल्या केंद्राच्या विकासाविषयक सूचनांनी या कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम सायंकाळी ६ वाजता संपला पण वेळ कसा निघून गेला हे कोणालाच कळले नाही.

## वडोदरा, गुजरात येथील खेळ–दिवस

दि. ३० मे २०१० रोजी, वडोदरा केंद्रातील स्वयंसेवकांनी अभ्यासींच्या मुलांकरिता विविध खेळांचे आयोजन केले होते. वडोदरा आश्रमाच्या हिरवळीवर सत्संगाच्यावेळी हा कार्यक्रम झाला. ३ ते १५ वर्षे या वयोगटातील २५–३० मुलांनी यात भाग घेतला. या मुलांचे वयानुसार गट पाडले होते. बटाटा शर्यत (३ वर्षाखालील मुले), १०० मिटर्स पळण्याची शर्यत (५ ते १० वर्षामधील मुले), चमचा–लिंबू आणि पोत्याची शर्यत (१० वर्षावरील मुलांकरिता) हे खेळ आयोजले होते. ह्या सगळ्या खेळांचा मुलांनी मनमुराद आनंद लुटला. ह्या कार्यक्रमामुळे मुलांमध्ये एकोपा, आनंद व निखळ स्पर्धेची भावना वाढण्यास मदत झाली. पालक व स्वयंसेवकसुद्धा या आनंदात सहभागी झाले होते.





श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र

# प्रकाशाचे केंद्र

"तुम्हीच तो प्रयोग आहात, तुम्हीच प्रयोगकर्ते आणि त्या प्रयोगाचा परिणाम पण तुम्हीच. तुम्ही जर असा विचार करीत असाल की तुम्ही गुरुदेव किंवा मिशनच्याप्रती बांधील आहात तर ते मूर्खपणाचे आहे. अशी कोणतीही बांधीलकी नाही, ही बांधीलकी नेहमीच तुमच्या स्वत:साठी आहे. हे जे कोणी लक्षात ठेवेल, तो भविष्यात विवेकपूर्वक वागेल. जे कोणी हे ध्यानात ठेवणार नाहीत, त्यांना सांगायला मला खेद वाटतो, पण त्यांचे भवितव्य अतिशय अंध:कारमय आहे."

## गौहाती आश्रम

गौहाती ही ईशान्येकडील आसाम राज्याची राजधानी आहे. येथील आश्रम अगदी नवीन आहे तर तिनसुकीया आश्रम हा तसा जुना असून त्याला परमपूज्य बाबूजी महाराजांचा पदस्पर्श लाभला आहे.

गौहाती केंद्रास दि. १० ते १२ फेब्रुवारी १९९३ दरम्यान पूज्य गुरुदेवांनी भेट दिली होती. यावेळी कल्याण भवनात सत्संग तसेच विविध कार्यक्रम झाले होते. गुरूदेवांनी अनेकवेळा सांगितले आहे की आसाम त्यांच्या चांगलाच परिचयाचा आहे कारण बालपणी जेव्हा ते भारतीय वनखात्यात नोकरी करणारे आपले काका श्री. भद्रन यांच्याकडे येत असत तेव्हा मैलोनमैल ते पायी फिरत असत तसेच घोड्यावरुन व हत्तीवरुन देखील संपूर्ण आसाममध्ये फिरत असत. त्यांच्या आठवणीतील गौहाती म्हणजे एक खूप मोठी नदी असणारे जंगल होते. ते असेही म्हणाले की तरुणपणी त्यांनी जगभरात ज्या ठिकाणी प्रवास केला त्या सर्व ठिकाणी पूज्य बाबूजी महाराजांचे कार्य जोरात सुरु होते व यांस आसामदेखील अपवाद नव्हता. गुरूदेवांनी बाहेरून आलेल्या अभ्यासींना येथील स्थानिक भाषा शिकण्यास व स्थानिक लोकांना मिशनमधे सहभागी करुन घेण्यास सांगितले जेणेकरुन आपण गुरुदेवांना दिलेल्या वचनाची पूर्तता करता येईल.

सुमारे ६,५०० वर्गफुट जमीनीचा तुकडा सन १९९८ मध्ये स्थानिक केंद्राने विकत घेतला. यातील काही भाग हा देणगीस्वरुपात होता तर ऊर्वरित भाग विकत घेण्यात आला. या जमिनीवर गवत आणि बांबूनी बनलेले एक छोटेखानी पण सुंदर असे कुटीर उभारले. त्या अगोदर, मैत्री मंदिर येथील अनाथालयात सत्संग घेतले जायचे.

सन २००९ मधे ह्या जागेवर काही प्रमाणात कायमस्वरुपी बांधकाम केले गेले ज्यामुळे रवीवारच्या सत्संगासाठी सुमारे १०० अभ्यासी आरामात बसु शकतील असे १६०० वर्गफुटाचे प्रशस्त ध्यानगृह तयार झाले. याबरोबरच येथे पूज्य गुरुदेवांकरिता एक सुसज्ज खोली, एक मोठे स्वयंपाकघर, मुलांसाठी जागा, आश्रमाची देखभाल करणाऱ्यांसाठी जागा, पाहुण्यांसाठी कक्ष तसेच तीनही बाजूंनी एक सुंदर बगिचा आहे.

या जागेचा फायदा असा की मिशनचे समारंभ व विभागीय पातळीवर अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम येथे आयोजित करता येऊ लागले. मिशनच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी या आश्रमास विविध प्रसंगी भेट दिली आहे. ज्यामध्ये सन २००४ मध्ये आसाम व ईशान्य भारताचा दौरा करणारे बंधू यु. एस. बाजपेयी, सन २००७ मध्ये आसाम व ईशान्य भारताकरिता आयोजित केलेल्या मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण शिबीराच्यावेळी आलेल्या भगीनी सीता कुंचितपादम व सन २००८ मध्ये गौहाती रिफायनरी या कंपनीकरिता आयोजिलेले ध्यान प्रशिक्षण शिबीराच्याप्रसंगी आलेले बंधू ए. पी. दुरै यांचा समावेश आहे.

सध्याचा आश्रम हा सध्याच्या अभ्यासींसाठी तसेच नजिकच्या काळातील विस्तारासाठी जरी पुरेसा असला तरी भविष्यातील मिशनची वाढ आणि विभागीय आश्रमाची गरज बघता, गौहाती विमानतळाजवळ सन २००९ मधे एक मोठी जागा खरेदी केली आहे. विभागीय आश्रमाबरोबरच ह्या जमिनीवर एका निवासी संकुलासाठी पण परवानगी मिळाली आहे, ज्याचे नाव पूज्य गुरूदेवांनी प्रेमानी "सहजपुरम सोसायटी" असे ठेवले आहे.

विभागीय आश्रम अस्तित्वात यायला अजून जरी खूप कालावधी असला तरी कार्यसिध्दीसाठी स्थानिक अभ्यासींना आमच्या अनेक शुभेच्छा.












© 2009 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.